IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# शिवकालीन आरमाराचे महत्त्व : एक ऐतिहासिक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम. इ. एस. कॉलेज मेहकर,
जिल्हा बुलढाणा.

**प्रस्तावना -**

“ज्याचं आरमार त्याचा समुद्र” म्हणजेच आरमार हे एक स्वतंत्र राज्यांगच होते असे दिसून येते. स्वतंत्र, सामर्थ्यवान आरमार निर्माण झाल्याशिवाय स्वराज्याला पूर्णत्व प्राप्त होणार नाही, हे शिवाजी महाराजांनी आपल्या दूरदृष्टीने जाणले होते. इ.स. 1657 च्या सुमारास शिवाजी महाराज कोकणात उतरल्यावर त्यांनी समुद्र जवळून पाहिला. त्यावेळच्या परकीय सत्तांमध्ये मुघल, जंजिऱ्यांचे सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज हे प्रामुख्यानं होते. यापैकी मुघल सोडले, तर इतर तिघांचा पश्चिम किनाऱ्यावर मोठा धाक होता. पोर्तुगीज तर स्वतःला हिंदी महासागराचे मालक समजत होते. बलाढ्य अशा मुघलांना देखील सागरी व्यापारासाठी पोर्तुगीजाकडून काताई (परवाना) विकत घ्यावा लागत असे. सोबतच सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज या तिघांना कर दिल्याशिवाय कोणतीही नौका समुद्रात विहार करून शकत नव्हती. या जाजेगिरीमुळे स्वराज्यातील मराठ्यांच्या व्यापाराला हा मोठा अडथळा होत होता. खोल समुद्रातल्या दळणवळणापेक्षा किनाऱ्याचं संरक्षण व्हावे, यासाठी आरमार निर्मिती शिवाय पर्याय नसल्याचे शिवाजी महाराजांच्या निदर्शनास आले. त्यांनतर 24 ऑक्टोबर 1657 रोजी कल्याण, भिवंडी, पेण या ठिकाणी जहाज बांधणीचे कार्‌य सुरू करून जहाज निर्मिती करण्यात आली. त्यामुळे 24 ऑक्टोबर हा दिवस **‘मराठा आरमार दिन’** किंवा **‘भारतीय आरामात दिन’** म्हणून साजरा केला जातो.

शिवाजी महाराजांना **‘भारतीय आरमाराचे जनक’** अर्थात **‘भारतीय नौदलाचे जनक’** देखील म्हणतात. शिवाजी महाराजांच्या पूर्वी देखील भारतात आरमार व्यवस्था अस्तित्वात होती. भारतीय राज्ये ज्यामध्ये चोळ, कलिंग येथील राज्यांकडे आपले स्वतःच्या मालकीचे आरमार होते. त्या आरमाराच्या भरोषावर त्यांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार हा भारतीय भूखंडाबाहेर देखील केला. मात्र त्यांनंतरच्या काळामध्ये या आरमाराचा वापर पूर्णपणे बंद झाला. भारतीय राज्यकर्ते आरमाराला कमी लेखून आरमार निर्मितीचे तंत्र आणि आरमारी व्यवस्थेचे महत्त्व काळ ओघात विसरले. मध्ययुगीन भारतात, मुस्लिम शासकांनी (जसे की दख्खन सल्तनत आणि मुघल सल्तनत) यांनी लढाऊ आरमाराचा विचारही केला नाही आणि सागरी व्यापार आणि दळणवळणासाठी परकियावर अवलंबून राहू लागले. या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांनी आपल्या छोट्याशा स्वराज्यात अल्प काळात अत्याधुनिक पद्धतीने, प्रगत उत्तम दर्जाची आरमार निर्माण करून सागरावर आपले वर्चस्व निर्माण समुद्रातील परकियांनी मक्तेदारी मोडकळीस आणली. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या आरमार व्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले आहे. यासाठी शिवकालीन आरमाराचे महत्व समजून घेणे सदर शोधनिबंधाचा उद्देश्य आहे.

## शिवकालीन आरमार -

शिवाजी महाराजांनी इ.स. 1656 मध्ये जावळी विजय मिळवून हा प्रांत काबीज केला. जावळीमध्ये कोकणाचा बराचसा भाग येत असल्याने शिवाजी महराजांचा कोकण प्रदेशात प्रवेश झाला. 4 नोव्हेंबर 1656 पूर्वी मराठे आणि सिद्दी यांच्यात अनेत लहान मोठ्या चकमकी झाल्या. ऑक्टोबर 1657 ते जानेवारी 1658 या कालावधीत शिवाजी महाराजांनी 100 किमी. लांबीचा समुद्रकिनारा आणि लगतचा प्रदेश हस्तगत केला. त्यांनी हस्तगत केलेल्या या नव्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी, सिद्दीच्या स्वराज्यातील वाढत्या कुरापती थांबविण्यासाठी सिद्दीला समुद्रमार्गे मिळणारी रसद तोडण्यासाठी नाविक दल (लढाऊ आरमार) असणे स्वराज्यासाठी गरजेचे होते. त्यासाठी योग्य अशी जागा / तळ स्थापन होणे आवश्यक होते. ऐन समुद्रामध्ये नौका बांधता येत नाहीत. लष्करीदृष्ट्या समुद्रामधून आत घुसलेली खाडी ही जहाज बांधणीसाठी उत्तम जागा असते या विचारता शिवाजी महाराज मग्न होते आणि शेवटी स्वराज्यातील कल्याण, भिवंडी व पेण या जिंकलेल्या प्रदेशात त्यांनी स्वराज्यातील नाही तर भारतातील पहिला जहाज बांधणी प्रकल्प उभा केला. येथे 24 ऑक्टोबर 1657 पासून जहाज निर्मितीस सुरुवात होऊन स्वराज्यात आरमाराचा पाया घातला गेले ज्यामुळे समुद्रावरील परकियांच्या वर्चस्वाला सुरुंग लावला. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या आरमाराचे महत्व एका कवीने असे नमूद केलेले आहे की,

**"देशी भार्गव क्षेत्र सागर तिरी नाना स्थळे योजिनी |**
**बंदी दुर्ग अनेक डोंगर शिरी बेटे बाले पाहुनी ||**
**जहाजे आरमार भर जलधि दुष्टांसी शिक्षा करी |**
**बारा मावळ देश पर्वत दरी बांधोनि किल्ले गिरी ||"**

## शिवकालीन आरमाराचे विश्लेषण -

शिवाजी महाराजांनी आरमार निर्मितीस सुरुवात केली ती स्वराज्यातील कल्याण, भिवंडी, पेण या ठिकाणापासून. इथेच त्यांनी वीस गुराब जहाज बांधणीचे कार्य सुरू झालं. स्वराज्यातील जहाज बांधणी दर्जेदार होण्याकरीता शिवाजी महाराजांनी पोर्तुगीज खलाशी 'लुई व्हेगास' आणि त्याचा मुलगा 'फेर्नो व्हेगास' यांच्यावर जबाबदारी सोपविली. लुई व्हेगास यांच्याकडून आपल्या कारागीरांना नौका बांधणीच प्रशिक्षण मिळण्याकरीता काही मराठी कामगार बांधणीचे कार्य करीत असे. मराठ्यांच्या बोटी-जहाजे अतिशय साध्या होत्या. नौकाबांधणी कारखान्यात विविध प्रकारची जहाजं बांधली जात असत. यामध्ये **गुराब** म्हणजे तोफा ठेवण्याच दोन शिडांच जहाज, **तरांडी** जहाजातून माणसांची आणि सैनिकांची वाहतूक करण्यासाठी, **तारवे** आणि **गलबतं** ही जलद चालणारी जहाजं होती, **शिबाड** ही व्यापारी प्रकारची जहाजं होती. या सर्व नौकाबांधणी ची प्रक्रिया शिकण्यास मराठे उत्सुक असल्याने त्यांनी ह्या कला आत्मसाद केल्या.

प्रथमतः ह्या नौका तयार झाल्यावर खोल समुद्रात जाण्यासाठी त्यांना अडचण होत होती. कारण खाडीच्या दोन्ही बाजूच्या प्रदेशावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. त्यामुळे दिवसा नौका विहार करणे स्वराज्याच्या हिताचे नव्हते हे जाणताच रात्रीच्यावेळी अतिशय सावधपणे पश्चिम समुद्रातुन नौका विहार करण्यास प्राधान्य देण्यात आले. शिवाजी महाराजांनी आरमाराचे नियोजनही अत्यंत व्यवस्थितपणे केलेले होते. दोनशे जहाजांचा ताफा तयार करून त्यावरील सुभा, दौलतखान, मायनाक भंडारी, वेंटगी सारंगी म्हणजेच दर्यासारंग, इब्राहिम खान असे नामांकित अधिकारी नेमले. सुमारे 5000 सैनिकांसह 400 जहाजांसह समुद्रावर आपले वर्चस्व निर्माण केले. इराण, बसरा, मक्का या ठिकाणांसोबत व्यापारास सुरूवात झाली. शिवाजी महाराजांनी इ.स. 1664 मध्ये सुरत शहराची मोठ्या प्रमाणात लूट केली; ज्यामधून खूप मोठी धन संपत्ती मिळाले. या धन संपत्तीचा उपयोग शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बांधकामासाठी केला. समुद्रामधील दळणवळण सोयीचे व्हावे आणि गोव्याच्या

पोर्तुगीजांवर आपला दरारा निर्माण करण्यासाठी सिंधुदुर्ग किल्ल्यांची बांधकामाची जबाबदारी हिरोजी इंदुलकर या वास्तुविशारदावर सोपवण्यात आली. ज्यामुळे सिंधुदुर्ग सारखा बळकट किल्ला मराठ्याच्या आरमार प्रशासनासाठी निर्माण झाला.

शिवाजी महाराजांनी इ.स. 1672 मध्ये मुंबईवर म्हणजेच इंग्रजांवर वचक बसण्याकरिता मुंबईजवळ खांदेरी बंदरावर किल्ला बांधकाम तसेच पद्मदुर्ग, विजयदुर्ग या जलदुर्गाची सुद्धा निर्मिती केली. पद्मदुर्ग वसवून शिवाजी महाराजांनी दुसरी राजापुरी उभी केली. इ.स. 1678 मध्ये कुलाबा किल्ल्यांचे बांधकाम सुरू झाले. जलदुर्ग बांधकामात पाण्याच्या प्रवाहाला विरोध कमी प्रमाणात व्हावा आणि बांधकाम दिर्घायुषी व्हावे यासाठी पद्मदुर्गच्या बांधकामात वेगळ्याच प्रकारचे तंत्र वापरले गेले आहे. किल्ल्याच्या भिंतीवर जिथं लाटा आदळतात तेथे 7-8 सेंटिमीटर दगड झिजलेले आहेत; पण यामध्ये वापरलेल्या चुन्याचे मिश्रण मात्र झिजलेले नाही. दगडापेक्षा भक्कम ताकद या चुन्यामध्ये प्रयत्नपूर्वक निर्माण केली असावी असे दिसून येते. खांदेरी किल्ल्याभोवती वेगवेगळ्या आकाराचे दगड टाकण्यात आले ज्यामुळे शत्रूला सहजासहजी किल्ल्याजवळ पोहोचणे शक्य होत नाही. किल्ल्याभोवती टाकलेल्या दगडावर कालवे वाढावेत म्हणजे कडा धारदार होतील आणि पाण्यातून चालत जाणं अवघड होऊन जाईल. विजयदुर्ग किल्ल्याच्या जवळ पाण्यात प्रचंड मोठी भिंत आहे ज्या भिंतीची लांबी सुमारे पाऊण - किलोमीटर तर रूंदी तीन मीटर आहे. ज्याचं किनाऱ्यापासून खोल समुद्रात बांधकाम करण्यात आलेलं आहे. शत्रूंच्या बोटी विजयदुर्ग किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी आल्या तर त्या भिंतीवर आपटून फुटत. मराठी बोटींचा तळ खोल नसल्यानं या भिंतीचा धोका नव्हता. इंग्रजांच्या विजयदुर्गवर झालेल्या हल्ल्यात इंग्रजांच्या बोटी भिंतीवर आदळून फुटल्या.

शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातील काही गोष्टी आरमारी धोरणाचा भाग म्हणून त्याची नोंद घेण्यायोग्य आहे. “आरमारावर मर्द मानसे, भांडी (तोफा), जंबुरे, बंदुखा, होकायंत्र, दारूगोळा ठेवावा. प्रत्येक सुभ्यास 5 गुराबा व 15 गलबते असावीत. आरमारास तनखा मुलखातून नेमून द्यावी. पैदास्तीवरी नेमणूक सहसा न करावी. पैदास्तिचे नेमणूकीमुळे सावकारास उपद्रव होऊन सावकारी बुडते. बंदरे राहिली पाहिजेत आरमार सुसज्ज असावे. आरमारकरी यांनी हमेशा दर्यात फिरून गनिम राखावा. जंजिरे यांचे सामान व दारू (तोफेची दारू) वरचेवर पाववीत जावी. सर्वकाळ दर्यावदी गनिमाचे खबरीत राहून गनिमाचे मुलुख मारावा. दर्यात कौल सावकारी तरांडी यांची आमदार फत्ती करावी. कौली सावकारकीच्या वाटी जाऊ देऊ नये. विदेशीची गैर कौली सावकारी तरांडी येता जाता आली तर त्यास सर्व साहित्य द्यावे, अल्पस्वल्प जकात घेऊन त्यास जाऊन द्यावे. गनिम दगाबत असेल तर त्याचे जहाज फोडून टाकावे. आरमारी छावनी दर्यात तुफान येण्यापूर्वीच करावी. ती एकाच जंजिरेखाली किंवा उघड्यावर करून नये. कारण गनिम बेभरवस्याचा असतो आणि दर्यावर्दी स्वभावतः उन्मत्त असतो. आरमारास डोलकाठ्या, तक्ते, सोट, आदीकरून थोर लाकूड असावे लागते ते आपल्या राज्यात अरण्यामध्ये सागवाणी वृक्ष आहेत. त्याचे जे अनुकूल पडेल ते हुजीर लेहून हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. या विरहित जे लागेल ते घरमुखितन खरेदी करून आनवीत जावे. आंबा, फणस हेही आरमाराच्या उपयोगीचे असल्यामुळे त्याचे जतन करावे, ती वाढविण्यास कष्ट पडतात म्हणून त्याचे मालकास योग्य मोल देऊन घ्यावीत, कोणतीही सक्ती करू नये. त्यांना दुःख होईल असे काहीही करू नये. रयतेच्या काडीलाही धक्का लावू नये, वाळक्या पाचोळ्यास हात लावू नये.” अशा स्पष्ट सूचना दिलेल्या त्यांच्या आज्ञापत्रातून दिसून येतात. ज्यामुळे शिवाजी महाराज हे किती प्रजादक्ष होते तसेच त्यांची दूरदृष्टी, युध्दनिती, राज्यविस्तार यासर्व गोष्टी पहायला मिळतात.

## शिवकालीन आरमाराचे महत्त्व -

शिवकालीन आरमाराचे महत्व जर आपल्याला जाणून घ्यायचे असेल तर आपल्याला शिवकालीन जंजिरा आणि सिंधदुर्ग किल्ला पाहणे आवश्यक आहे. त्याशिवाय शिवकालीन आरमाराचे महत्व लक्षात येणार नाही. आज 350 वर्षांनंतर देखील सागरी लाटा, वादळ, वारा आणि असंख्य संकटानंतर देखील जंजिरा आणि सिंधुदूर्ग किल्ला मोठ्या दिमाखात समुद्रात उभा आहे. हे शक्य झाले ते केवळ त्यांच्या आरमार व्यवस्थेमुळे. त्यामुळे मराठ्याच्या इतिहासात आरमार अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. जंजिऱ्याचा किल्ला हा पक्क्या कातळावरती उभा असलेला किल्ला आहे. पूर्ण ओहोटीच्या वेळी पौर्णिमेच्या आसपास हा खडक उघडा पडतो. पूर्ण भरतीच्या वेळी मात्र समुद्र पातळीपासून तटाची उंची सुमारे 15 मीटरपर्यंत सहज भरते. जंजिरा किल्ला ज्या कातळावर उभा आहे, त्याचा घेर अडीच किलोमीटर आहे. जंजिऱ्यावर एकूण 24 (22+2) बुरुज आहेत. तटबंदीमध्ये 22 बुरुज आहेत. 23 वा बुरुज गगनबुरुज असून तो शेपटीच्या तोफेचा आहे. 24 वा बुरुज खुनी बुरुज असून तो मध्यभागी आहे. जंजिरा किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. महादरवाजा पूर्व दिशेला तोंड असलेला आहे. पश्चिमेला एक धक्का आहे तिथे एक दरवाजा आहे त्याला **'दर्या दरवाजा'** म्हणतात. जंजिरा किल्ल्याचा परीघ अडीच किलोमीटरचा आहे. इ.स. 1669 मध्ये या किल्ल्यावर 572 तोफा होत्या, अशी नोंद आढळते. जंजिरा किल्ल्याच्या आत 70 मीटर उंचीच्या उंचवट्यावर एक बालेकिल्ला आहे. याच्या तोडीचा एकही किल्ला अन्यत्र नाही.

स्वराज्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने आरमाराचे भविष्यकालीन महत्त्व जाणूनच शिवाजी महाराजांनी स्वराज्यात आरमाराचा पाया घातला. शिवाजी महाराजांनी केलेले प्रत्येक कार्य हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रत्येक संबधित गोष्टीच्या सर्व बारकाव्याचा विचार करून केलेले होते. त्यामुळे फक्त भारतीयांना शिवकालीन आरमाराचे महत्व समजले असे नाही तर परकियांनी देखील शिवकालीन आरमाराचे महत्व जाणले होते. तत्कालीन काळातील परकियांच्या पत्रव्यवहार आणि त्यांच्या नोंदीवरून शिवकालीन आरमाराचे महत्त्व लक्षात येते. इ.स. 1667 मध्ये शिवाजी महाराजांच्या वाढत्या सामर्थ्याबद्दल विजरई कोंदी द साव्हिसेन्ति याने एका पत्रात व्यक्त केलेले मत उल्लेखनिय आहे. "शिवाजीचे नौदलही मला भितीदायक वाटते. कारण त्यांच्याविरूध्द आम्ही सुरूवातीपासूनच कारवाई न केल्यामुळे त्यांनी किनाऱ्यावर किल्ले बांधिले आणि आज त्यांच्याजवळ पुष्कळ तारवे आहेत, पण ही तारवे मोठी नाहीत तरीही आक्रमण, मजबूत असल्याने भीतीदायक आहे." इंग्रजांच्या 1 नोव्हेंबर 1679 च्या पत्रात लिहिलेला उल्लेख आहे की, "त्या लहान सरपटणाऱ्या होड्या आम्हाला आश्चर्यकारकरितीने चकवतात, आता आम्हाला असे वाटू लागले आहे की, आमच्याकडे तसल्या होड्या असतील तर - आम्हालाही मदत होऊ शकेल" पत्रातील उल्लेखनावरूनचे शिवाजी महाराजांची आरमाराबाबतची दूरदृष्टी कळून येते.

## निष्कर्ष -

1. शिवाजी महाराजांचे आरमार पाहिल्यावर त्यांची विज्ञाननिष्ठा, आधुनिकता आणि भविष्याचा वेध घेण्याची दृष्टी आपल्याला समजून येते.
2. शिवाजी महाराजांनी स्वतंत्र आरमार उभारून स्वराज्याला बळकटी आणली.
3. शिवाजी महाराजांनी समुद्र मोहिमा काढल्या, व्यापार-उद्योग निर्मिती केली, परकीयांशी आपले संबंध प्रस्थापित केले, किनारपट्टीवरील धुमाकूळ - लूटालूट घालणाऱ्यावर स्वराज्याचा दरारा निर्माण केला.
4. शिवाजी महाराजांनी आरमार स्थापन करून मुघलशाही, आदिलशाही, डच, पोर्तुगीज, टोपीकर (इंग्रज), हबशी, सिद्दी, फिरंगी या आरमारी बलाढ्य सत्तांना जबर बसविली यावरून त्यांची आरमारी युध्दनितीची कला किती कौशल्यवान आहे हे दिसते.

5. शिवाजी महाराजांनी आरमार उभं केले आणि दर्या म्हणजेच समुद्र प्रसन्न केला. रयतेकरीता स्वराज्य निर्माण करायला समुद्राने देखील साथ दिली असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.
6. समुद्र पार करण्याची जेथे कल्पनाही करणे अशक्य होती अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांनी स्वतंत्र आणि आधुनिक पद्धतीचे आरमार स्वराज्यात निर्माण केले आणि स्वराज्याला बळकटी प्रदान केली यावरून शिवकालीन आरमाराचे महत्व लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. Jean Deloche - The indian Economic & social History Review, 1 January 1978.
2. Radhakumud Mookerji - A History Of Indian Shiping And Maritime Activity From The Earliest Times, LONGMANS, GREEN AND CO.BOMBAY, 1912.
3. कुलकर्णी श्री.रं, - शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1984.
4. मेहेंदळे, गजानन भास्कर ; शिंत्रे संतोष - शिवछत्रपतीचे आरमार, परम मित्र पब्लिकेशन, ठाणे, दुसरी आवृत्ती, 2020.
5. देशमुख, विजय - महाराजांच्या मुलुखात, वैशाली प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, ऑक्टोबर 1976.
6. पाटील, गौतम - शिवकालीन प्रशासन, कैलास पब्लीकेशन्स औरंगाबाद, प्रथमावृत्ती 17 एप्रिल 2014.
7. सेन, डॉ. एस. एन. (शिवदे, डॉ. सदाशिव - अनु.) - मराठ्यांची लष्करी व्यवस्था, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2011.